महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास
प्राधिकरण यांना अकृषिक परवानगी
घेण्यापासून सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: एनएपी-१०९४/१२२८४३/प्र. क्र. ११/ल. २
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, १९९४

वाचा : शासन परिपत्रक क्रमांक-एनएजे-१०७२/३८९९६/सी-२,
दिनांक २३. १. ७३

परिपत्रक :

उपरोक्त शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादन केलेल्या किंवा शासनाने अकृषिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाला शासनाने प्रदान केलेल्या जमीनी त्याच कारणाकरीता उपयोगात आणताना अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

२. दिनांक १५. १२. ७७ पासून महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे रुपांतर "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण " [म्हाडा] असे करण्यात आल्याने दिनांक २३. १. ७३ च्या परिपत्रकातील तरतुदी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला अशी धारणा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने व्यक्त केली आहे.

तसेच महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी म्हाडा ॲक्ट, १९७६ अन्वये संपादित केलेल्या व या व्यतिरिक्त शासनाकडून नागरी जमीन कमाल कायदा १९७६ खाली अतिरिक्त म्हणून घोषित केलेल्या व महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांना प्राप्त झालेल्या जमिनींना सुद्धा उपरोक्त पत्रकातील तरतुदी लागू करण्यात अशी विनंती केलेली आहे.

सदर बाब नगर विकास विभाग व गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्याने तपासण्यात आली असून महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांची कार्यप्रणाली व कर्तव्य एकच असल्यामुळे शासन परिपत्रक क्रमांक: एनएजे-१०७२/३८९९६/सी-२, दि. २३. १. १९७३ (प्रत सोबत आहे) मधील तरतुदी महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण [म्हाडा] यांना लागू करण्यास या परिपत्रकान्वये मंजूरी देण्यात येत आहे. तसेच म्हाडा ॲक्ट १९७६ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये संपादित केलेल्या आणि महाराष्ट्र नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ अन्वये प्राप्त झालेल्या जमिनींना सुद्धा उपरोक्त परिपत्रकामधील तरतुदी लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार

[ ल. तु. नारी ]
कार्यासनअधिकारी
महसूल व वन विभाग.

रत्नागिरी
पावती
-7 NOV 1994
जिल्हाधिकारी